पुढारी | पुणे, रविवार
७ जानेवारी २०१८

# कृत्रिम वाळूचा पर्याय पर्यावरणहिताचा

## वास्तूविशारद चाफळकर यांचे मत

**पुणे : प्रतिनिधी**

नद्या, समुद्र, तलाव आणि नाले या जलस्त्रोतांमध्ये बेसुमार वाळू उपसा केला जातो. त्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होतो व नदी आणि नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहात बाधा येते. बांधकामांसाठी बेकायदा वाळू उपशाचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. त्यामुळे जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. या नैसर्गिक वाळूला बॉटम ॲश, कृत्रिम वाळू, फाउंड्री ॲश असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. या पर्यायाच्या वापरासाठी शहरातील बांधकाम व्यावसायिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वास्तूविशारद पूजा चाफळकर यांनी केले.



किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत शुक्रवारी 'आल्टरनेट सॅन्ड' या विषयावर चाफळकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी महोत्सवाच्या संयोजक सुप्रिया चित्राव उपस्थित होत्या.

यावेळी चाफळकर म्हणाल्या, रस्ते, पूल, इमारती अशा विविध बांधकामांसाठी मोठ्या प्रमाणावर वाळू लागते. यासाठी नैसर्गिक वाळूला सध्या मोठी मागणी आहे. यामुळे बेकायदा वाळूउपसा मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र, वाळू हा अपारंपारिक घटक आहे. त्याची निर्मिती होऊ शकत नाही. वाळूच्या बेसुमार उपशामुळे जैवविविधतेला धोका निर्माण होतो. पूर, समुद्राचे अतिक्रमण वाढते. परिणामी सजीवसृष्टीला धोका पोहोचतो. त्यामुळे वेगळ्या पद्धतीने बांधकामांची रचना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

नैसर्गिक वाळूला सध्या अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्याचा वापर करता येऊ शकतो. अशा प्रकारच्या पर्यायांचा वापर शहरातील काही बांधकाम व्यावसायिकांनी सुरू केला आहे. जैवविविधता जपण्यासाठी भविष्यात अधिकाधिक बांधकाम व्यावसायिकांनी वाळूऐवजी या पर्यायांचा वापर करणे, आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले .